एम.एच.एम.एम.क्र.१८-००८८९१-२०१४

दाखल दिनांक : १९/०८/२०१४.
नोंदणी दिनांक : २२/०८/२०१४.
निकाल दिनांक : ०५/०८/२०२६
कालावधी : वर्षे ११ महिने ११ दिवस १७

निशाणी क्र. : १५

भाग अ

| |
|---|
| प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ७१ वे न्यायालय,<br>बांद्रा, मुंबई यांचे न्यायालय.<br><br>(पिठासीन न्यायाधीश- श्री सं. मो. घुगे)<br>(J.O.Code-MH2587) |
| प्रकरण क्र.१२१२/पीएस/२०१४<br>(सी.एन.आर. क्र.एम.एच.एम.एम.१८-००८८९१-२०१४) |
| गुन्हा नोदं क्र.११६/२०१४, पोलीस स्थानक-वाकोला, मुंबई.<br>भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३०४ (अ) अन्वये. |

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन मार्फत ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्थानक-वाकोला, मुंबई. |
| अभियोग पक्षातर्फे | : | सहाय्य्क सरकारी अभियोक्ता<br>श्री डी. एस. पाटील. |
| आरोपी | | मोहम्मद मुकीम मोहम्मद फारुक शेख.<br>वय : २८ वर्षे,<br>व्यवसाय : चालक.<br>राहणार : कुर्ला (प), मुंबई. |
| आरोपीतर्फे विधि | | श्री शर्मा . |

भाग ब
( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | ०३/०४/२०१४. |
| तक्रार दाखल दिनांक | | ०३/०४/२०१४. |
| दोषारोप पाठविल्याचा दिनांक | | १९/०८/२०१४. |
| आरोपी यांच्याविरुध्द् दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | | १९/०६/२०१८. |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | | १५/०७/२०२६. |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | | ३१/०७/२०२६. |
| न्यायनिर्णय दिनांक | | ०५/०८/२०२६. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | | निरंक |

आरोपी यांची माहिती

| आरोपी क्र. | आरोपी यांचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याच ी दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.चे कलम अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | मोहम्मद मुकीम मोहम्मद फारुक. | ०३/०४/ २०१४ | ०४/०४/ २०१४ | भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३०४ (अ) अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

## भाग क
## ( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ अन्वये)
## सरकारी पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षाचे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | सरकारी पक्षाचे साक्षीदार - | | |

| सा. क्र. | साक्षीदार यांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| (१) | दिपक बाळकृष्ण बनवे. | पंच | (नि.क्र.१३) |

| | | | |
|---|---|---|---|
| (ब) | बचाव पक्षाचे साक्षीदार - | | |

| सा. क्र. | साक्षीदार यांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | न्यायालयामार्फत साक्षीदार - | | |

| सा. क्र. | साक्षीदार यांची नावे | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## सरकार पक्षातर्फे / बचाव पक्षातर्फे / न्यायालयातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक

| | |
|---|---|
| (अ) | सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक - |

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रंमांक |
|---|---|---|
| (१) | घटनास्थळ पंचनामा | (नि.क्र.१४) |

| | |
|---|---|
| (ब) | बचाव पक्षातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक - |

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रंमांक |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

| | |
|---|---|
| (क) | न्यायालयामार्फत देण्यात आलेले निशाणी क्रमांक - |

| अ.क्र. | वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

| | |
|---|---|
| (ड) | महत्वपूर्ण मुदर्देमाल (Material Object) - |

| अ.क्र. | महत्वपूर्ण मुदर्देमाल (Material Object) | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

न्यायनिर्णय
(घोषित दिनांक ०५ ऑगस्ट २०२६)

आरोपी यांच्याविरुध्द् भारती दंड संहिताचे कलम २७९, ३०४ (अ) अन्वये गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

२. अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः

फिर्यादी संतोष तुळशीराम कांबळे हे टेम्पो चालक असून दि.०३/०४/२०१४ रोजी, सकाळी सुमारे ०६.३० वाजता, त्यांनी हनुमान मंदिराजवळील सांताक्रुझ टेम्पो नाका, येथे त्यांचा टेम्पो लावला व ते तेथे उभे होते. त्यावेळी कलानगरच्या दिशेने येणारे वाहन क्र.एमएच-०१-बीडी-६०९९ ने वाकोला बस स्थानक, पश्चिम दुरतगती मार्ग येथे एका वयस्कर इसमास रस्ता ओलांडताना जोराने धडक दिली. त्यामुळे सदर व्यक्ती गाडीच्या पुढिल बाजूच्या काचेवर जोराने आपटला आणि बाजूला पडला. इतर लोकांच्या मदतीने सदर वाहन चालक थांबल्यामुळे त्यांनी जखमी व्यक्तीला व्हि. एन. देसाई रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी जखमी व्यक्तीच्या डाव्या पायाला फॅक्चर झाले व डोक्यामध्ये रक्तस्त्राव झाल्याचे सांगितले. जखमी व्यक्तीलापुढिल उपचारासाठी सायन रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. फिर्यादीने पोलीस स्थानक वाकोला येथे सदर घटनेबाबत आरोपीच्या विरुध्द् फिर्याद नोंदवली.

३. वाकोला पोलीस स्थानकाचे अंमलदार यांनी सदर तक्रारीन्वये अपराध क्र.११६/२०१४, भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३३८, ३०४ (अ) अन्वये नोंद केला व त्याचा तपास पोलीस ऊप निरिक्षक श्री सुनिल माने यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. तपासादरम्यान आरोपी यांना अटक केली. घटनास्थाळावर जावून पंचासमक्ष पंचनामा केला. मृताच्या शवाचा पंचनामा केला. जखमीचे वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. शवविश्वेदन अहवाल प्राप्त केला. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा अपघातातील वाहनाबाबतचा अहवाल प्राप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासाअंती आरोपी यांच्याविरुध्द् न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४. प्रस्तूत कामी आरोपी हजर झाला. माझे पूर्वाधिकारी यांनी त्यांच्याविरुध्द् भारतीय दंड विधान कलम २७९, ३०४ (अ) अन्वये दोषारोप (नि.क्र.२) ला निश्चित केले आहे व दोषारोप पत्रातील मजकूर आरोपी यांना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला आहे. परंतु आरोपी यांनी आरोप नाकारले व प्रकरण चालवण्याची विनंती केली.

५. अभियोग पक्षातर्फे केवळ पंच दिपक बाळकृष्ण बनवे (सा.क्र.१) यांची साक्ष (नि.क्र.१३) वर नोंदवण्यात आली आहे. आरोपी यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही.

६. प्रस्तूतचे प्रकरण ११ वर्षे जुने आहे. वारंवार संधी देवूनसुध्दा् अभियोग पक्षाने फिर्यादी, मयत इसमाचा मुलगा, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी, तपास अधिकारी यांची साक्ष नोंदवलेली नाही. अशा परिस्थितीमध्ये अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

७. अभियोग पक्षामार्फत पुरावा सादर करण्यात आला. आरोपी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वये संपरिक्षा (नि.क्र.१४) दि.३१/०७/२०२६ रोजी नोंदवण्यात आली. खोटया केसमध्ये फसवले आहे, असा आरोपीचा बचाव आहे.

८. अभियोग पक्षातर्फे विव्दान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी. एस. पाटील व आरोपी यांच्यातर्फे विव्दान विधिज्ञ श्री शर्मा यांचा समग्र युक्तिवाद ऐकण्यात आला.

९. उपलब्ध पुरावा व सादर करण्यात आलेला युक्तिवाद यावरुन खालील मुददे् माझे विचारार्थ निष्पन्न झाले. सदर मुद्दयांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे -

| अ.क्र. | मुदद्े | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे का की, दि.०३/०४/२०१४ रोजी, सुमारे १८.३० वाजता, वाकोला पोलीस स्थानक बस थांबा, हनुमान मंदिराच्या जवळ, हनुमान टेकडी, उत्तर वाहिणी, पश्चिम द्रुतगती महामार्ग, सांताकुझ-पूर्व मुंबई येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटर वाहन नोंदणी क्र.एमएच-०१-बीडी-६०९९ हे वाहन हलगर्जीपणाने आणि अविचाराने चालविले व जेणेकरुन मानवी जीवीतास धोका किंवा इजा पोहचू शकली असती आणि आरोपी यांनी भारतीय दंड संहिताचे कलम २७९ अन्वये गुन्हा केला ? | | नकारार्थी |
| २ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी आणि ठिकाणी येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन हलगर्जीपणे आणि अविचाराने चालवून इसम नामे बाबाजी सिताराम देवे यांना धकड दिल्यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली व त्यांच्या मृत्युस कारणीभूत ठरला आणि आरोपी यांनी भारतीय दंड संहिताचे कलम ३०४ (अ) अन्वये गुन्हा केला ? | | नकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | | आरोपी यांना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## कारणमिमांसा

१० प्रस्तूत आरोपी यांच्याविरुध्द् गुन्हा शाबीत करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे केवळ पंच दिपक बाळकृष्ण बनवे (सा.क्र.१) यांचा तोंडी पुरावा (नि.क्र.१३) वर नोंदविला आहे.

११. आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटर वाहन हे वाहन हलगर्जीपणाने आणि अविचाराने चालविले व जेणेकरुन मानवी जीवीतास धोका किंवा इजा पोहचू शकली असती अशारितीने चालवून पादचारी इसम नामे बाबाजी सिताराम देवे यांना धकड दिल्यामुळे

त्यांना गंभीर दुखापत झाली व त्यांच्या मृत्युस कारणीभूत ठरला, हया बाबी शाबीत करण्याची संपूर्णपणे जबाबदारी अभियोग पक्षाची आहे.

मुददे क्र.१ व क्र.२ करिता -

१२. पंच दिपक बाळकृष्ण बनवे (सा.क्र.१) यांनी त्यांची साक्ष (नि.क्र.१३) मध्ये असे सांगितले आहे की, दि.०३/०४/२०१४ रोजी, वाकोला पोलीस स्थानकाचे पोलीस श्री माने यांनी त्यांना दुतगती महामार्गावरील अपघाताच्या ठिकाणी बोलावले व त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.१४) केला.

१३. बचाव पक्षाने केलेल्या उलट तपासामध्ये पंच दिपक (सा.क्र.१) यांनी मान्य केले आहे की, ते घटनास्थळावर न जाता पोलीस स्थानकात गेले होते. घटनास्थळ पंचनामाचा मजकूर त्यांना माहित नाही. त्यांनी केवळ पोलीसांच्या सांगण्यावरुन स्वाक्षरी केली. ज्यावेळी त्यांना पोलीसांनी पोलीस स्थानकात बोलावले होते त्यावेळी त्यांना अपघाताबाबत माहिती नव्हती.

१४. प्रसूतचे प्रकरण ११ वर्षे जुने आहे. वारंवार संधी देवूनसुध्दा् अभियोग पक्ष मृताच्या मुलाचा व फिर्यादी यांचा जबाब नोंदवण्यास अयशस्वी ठरला आहे. अभियोग पक्षाने घटनास्थळावरील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, तपासी अधिकारी, वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष नोंदवलेली नाही. अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांना हजर केले नाही. अभियोग पक्षाकडे असा कोणताही पुरावा नाही की, दि.०३/०४/२०१४ रोजी, सकाळी सुमारे ०६.३० वाजता, हनुमान मंदिराजवळील सांताक्रुझ टेम्पो नाका, येथे कलानगरच्या दिशेने येणारे वाहन क्र.एमएच-०१-बीडी-६०९९ ने वाकोला बस स्थानक, पश्चिम द्रुतगती मार्ग येथे एका वयस्कर इसमास रस्ता ओलांडताना जोराने धडक दिली. त्यामुळे जखमी व्यक्तीच्या डाव्या पायाला फॅक्चर झाले व डोक्यामध्ये रक्तस्त्राव झाला व तो मयत झाला. म्हणून आरोपी पुराव्या अभावी निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहे. परिणामी मुददा् क्र.१ व क्र. २ ची उत्तरे नकारार्थी देण्यात येत आहेत. मुददा् क्र.३च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

मुद्दा क्र.३ करीता -

मुद्दा क्र.१ व क्र. २ चे निष्कर्ष नकारार्थी असल्याने आरोपी या गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

अ. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३०४ (अ) या गुन्हयातून आरोपी मोहम्मद मुकीम मोहम्मद फारुक शेख यांना निर्दोष मुक्त करण्यात येते.

ब. फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७ (अ) नुसार आरोपी यांनी प्रत्येकी रु.१५,०००/- चा त्यांचा वैयक्तिक व जातमुचलका बंधपत्र पुरवावे.

क. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला आहे.

Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2026.08.05 18:21:31 +0530

(सं. मो. घुगे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.

दि.०५/०८/२०२६
सराद

श्रुतलेखन दिनांक - ०५/०८/२०२६
प्रतिलेखन दिनांक - ०५/०८/२०२६
स्वाक्षरी दिनांक - ०५/०८/२०२६
सराद

## प्रमाणपत्र

| | |
|---|---|
| मी प्रतिज्ञेवर कथन करतो की, या पी.डी.एफ. न्यायानिर्णयातील सर्व शब्द मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे आहेत. | |
| न्यायालय | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,<br>७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई. |
| लघुलेखकाचे नाव | संदिप रामभाऊ दरेकर. |
| न्यायनिर्णय घोषित करण्याचा दिनांक | ०५/०८/२०२६. |
| न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | ०५/०८/२०२६ |